स्थानिक स्वराज्य संस्थेत महीलांचे राजकिय सक्षमीकरण

प्रा. डॉ.शुद्धोधन एस. गायकवाड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
भवभूती महाविद्यालय, आमगाव जि.गोंदिया
Email - ssgaikwad746@gmail.com

Crossref DOI -

प्रस्तावना :

महीलांचे सक्षमीकरण आणि स्वावलंबन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. महीलांचे सक्षमीकरण झाल्याशिवाय त्या स्वावलंबी होऊ शकत नाही. महीला स्वावलबी झाल्या, आपल्या पायावर उभ्या राहील्या, आपले आणि कुटुंबाचे निर्णय स्वतः घेऊ लागल्या. राज्यघटनेच्या 73 व 74 व्या कलमामध्ये घटना दुरूस्तीनंतर महाराष्ट्र शासनाने नागरी व ग्रामीण संस्थामध्ये 33 टक्के आरक्षण महीलांसाठी राबवून अत्यंत गौरवास्पद कामगिरी केली आहे. त्यामूळे आता महीलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये 50 टक्के आरक्षण पंचायत राज संस्थामध्ये दिले आहे. सरकारी नोकऱ्यामध्ये 30 टक्के आरक्षण महीलांकरीता ठेवले गेले आहे. बहुसंख्य ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर महीला असल्याचे चित्र ठळकपणे दिसून येत आहे. गावागावातल्या सर्वसाधारण कष्टकरी महीला आर्थिकदृष्टया स्वावलंबी व्हाव्यात म्हणून, स्वयंसहायता बचत गट स्थापन करण्यात आले आहे. सन 1952 ते 2020 पर्यंत अनेक महीला आमदारांनी महाराष्ट्राच्या विधीमंडळात उल्लेखनिय कामगिरी बजावलेली आहे. भारताचे पंतप्रधान पद स्वर्गिय इंदिरा गांधी तसेच सर्वोच्च राष्ट्रपतीपद श्रीमती प्रतीभाताई पाटील यांनी भुषविले आहे. सध्याच्या कालखंडात देषाच्या अर्थमंत्री निर्मला सितारामायन हया सक्षमपणे कार्य करीत आहे. आज महीला सर्वच क्षेत्रात अगेसर आहेत.

महीलांना राजकीय न्याय :

भारताची राज्यघटना तयार झाली तेव्हाच महीलांना मतदानाचा राजकीय अधिकार प्राप्त झाले. आज देषाच्या पंधरा राज्यामध्ये पंचायत राज संस्थेत महीलांसाठीचे आरक्षण 33 टक्क्यावरून 50 टक्क्यापर्यंत वाढविण्यात आले आहे. पंचायत राज संस्थाच्या माध्यमातून अधिकारांच्या विकेंद्रिकरणाचे प्रमाण वेगवेगळे आहे. महाराष्ट्र हे राज्य पंचायत राज व्यवस्था काटेकोरपणे राबविण्यात आघाडीवर आहे. 73 व्या घटनादुरूस्तीने तर महीलांना समान संधी आणि त्यांच्या व्यापक सहभागाबद्दल एक संस्थात्मक कलाटणी दिली आहे. ज्यामूळे लोकषाहीच्या निरंतर प्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग अगदी तळागळापर्यंत पोहचला आहे. महीलांच्या राजकीय सबलीकरणामध्ये 73 व्या घटनादुरूस्तीने योगदान दिले आहे. ग्राम पंचायत ते जिल्हा परिषद, ज्यामध्ये एकूण स्थानीक विकासासंदर्भातील निर्णय प्रक्रिया होत असते, अशा प्रक्रियेत महीलांचा सहभाग वाढावा यासाठी शासन सहभाग प्रयत्न करीत असते. महीलांनी ग्राम सभेत सहभाग घेणे, ग्रामसभेत महीला विकासासाठी असलेल्या निधीचा योग्य वापर करणे, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सामील असलेल्या महीलांना प्रषिक्षण देणे व मार्गदर्शन

करणे इत्यादी बाबींचा समावेष होतो. आतापर्यंत 28099 महीला या ग्रामपंचायत ते जिल्हा परिषद अध्यक्ष, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य म्हणून सामील झाल्या आहेत. पुरूषांसोबत महीलाचेही घर व कुटुंबाच्या मालमत्तेवर समान अधिकार असावा यासाठी जाणीवजागृती करण्यात येत आहे. महीलांच्या सर्वांगीण आणि परिपूर्ण विकासासाठी महीला धोरण आखणारे महाराष्ट्र हे देषातील महीले राज्य ठरले. महाराष्ट्राने महीलांना राजकिय व सामाजिक निर्णय प्रक्रियेच्या केंद्रस्थानी आणले. त्याचे निश्चित चांगले परिणाम दिसून येत आहेत. महीलांना राजकिय न्याय स्थापीत करणारा निर्णय क्रांतीकारी स्वरूपाचा ठरला आहे.

महीलांना सत्तेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 1993 साली 73 वी, 74 वी घटना दुरुस्ती स्त्री-पुरुष समानतेच्या दिसेने ते महत्वाचे पाऊल ठरले. या घटनादुरुस्तीनुसार महिलांच्या राज्यकारभारातील सहभाग वाढू लागन्याने समाजातील स्त्री-पुरूष विषमता नष्ट होण्यास मदत होऊ लागली. त्यामूळे 2010 मध्ये स्थानिक स्वराज्य संख्यामधील महिलांसाठी 50 टक्के राखीव जागांची तरतूद करण्यात आली. महीलांच्या बाबतीत सध्या परिस्थिती बदलली आहे. महीलांचे साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. तीच्या सुरक्षितेचे कायदे बनविण्यात आले आहे. भारतीय समाजाचा अर्धा भाग महीला असल्यामूळे महीलांचे सक्षमीकरण होणे हे भारताच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

पंचायत राज योजनेतील सर्वात तळाषी ग्राम सभा ही ग्राम पंचायतीच्या अंतर्गत सर्व पात्र मतदारांचा समावेश ग्रामसभेत होतो. ग्रामसभेचे कार्यक्षेत्र गावापूरतेच मर्यादीत असते. ग्रामसभा सर्वसाधारणपणे वर्षातून दोनदा भरते. ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांच्या राजकिय सहभागासोबत आर्थिक विकासाचाही प्रयत्न केला जातो. तसेच ग्रामीण लोकांचा शासन कार्यात राजकिय सहभाग वाढून स्थानिक लोककल्याणाच्या योजना व विविध योजनाचा लाभ मिळवून देणे या माध्यमातून मताधिकाराचा वापर करण्यात स्त्रियांचे योगदान वाढत आहे. महीला राजकिय मतदान प्रक्रियेत त्या जागृत आणि सतर्क राहून मतदान करतात.

भारताच्या विकासात स्त्रियांचे योगदान :

19 व्या शतकामध्ये भारतीय समाज व्यवस्थेमधील स्त्रियांच्या दुय्यम स्थानाविषयी सर्वप्रथम ज्योतिबा फुले यांनी बोट ठेवले. स्त्री-पुरूष समानतेसाठी स्त्रीयांना पुरूषाप्रमाणेच षिक्षण मिळणे आवश्यक आहे. सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुलेच्या कार्यात मोठा हातभार लावला. सर्वत्र भारताच्या संविधानात स्त्री-पुरूष समानता निर्माण करण्यासाठी स्त्रियांना पुरूषासारखे अधिकार प्रदान केले. भारतीय राजकारणात पुरूषांपेक्षा स्त्रियांचा सहभाग कमी दिसून येतो किंवा स्त्रीयांना राजकारणाची संधी प्राप्त करून दिली नाही. परंतु सध्याच्या काळात ज्या महिला आपल्या कर्तत्वाने पुढे आल्या त्यांनी आपल्या कार्यामधून समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली. उदा. भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गाधी, निर्मला सिमारमन, स्मृती ईरानी, माजी मुख्यमंत्री मायावती, पश्चीम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, तामीळनाडूच्या माजी मुख्यमंत्री जयललीता या सर्व महीला नेत्यांची नेतृत्व क्षमता कोणत्याही पुरूष राजकारण्यापेक्षा कमी नाही.

महाराष्ट्राच्या राजकारणात निलम गोऱ्हे, शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड, पंकजा मुंडे, अदीती तरकरे, खासदार, सुप्रियाताई सुळे, प्रणिती शिंदे यांनी आपला प्रभाव सिद्ध केला आहे. भारताच्या केंद्र व राज्य सरकारातील

राजकारण येत्या काही दिवसात महिला नेत्यांनी प्रभावित होऊन स्त्रियांचा सहभाग वाढणार आहे. भारताने स्त्रियांच्या सबलीकरणाच्या क्षेत्रात क्रातिकारी पाऊल टाकणार आहेत. पंचायत राज कायद्यामूळे ग्रामीण भागातील राजकिय चित्र बदलू लागले आहे. स्थानिक स्वराज संख्यमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठया प्रमाणात वाढला आहे. शहरी स्त्रियांना सर्व दृष्टीने संधी जास्त प्रमाणात मिळत असली तरी ग्रामीण, दलित, आदिवासी स्त्रियांही राजकारणात सहभाग घेतांना दिसत आहेत. गावाचा विकास पाणी, शाळा, रस्ते, दारूबंदी, षिक्षण, आरोग्य, आंगणवाडी, हुंडाबंदी, अन्याय, अत्याचार इत्यादी विषय महिलांनी पुढे आणले आहे.

स्त्री शिक्षण, स्त्रियांमधील जागृती तसेच देशाच्या स्वातंत्र्य लढयाच्या निमित्ताने घराबाहेर पडलेली भारतीय स्त्री आज सर्वच क्षेत्रामध्ये सर्वोच्च स्थान मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. 21 व्या शतकात कुटुंब विकास, समाज विकास आणि राष्ट्र विकासाच्या दिशेने स्त्रियांची वाटचाल सुरू झाली. आज भारतामध्ये महीलांचे लक्षावधी बचत गट स्थापन झाले आहेत. त्या माध्यमातून महीलांनी आपले गांव हागणदारी मुक्त, आपले कुटुंब दारूमुक्त करण्याचा प्रयत्न प्रथमतः आदिवासी व दलित मागासवर्गीय महीलांनी आपल्या क्षेत्रात सुरू केला. राष्ट्रविकासाच्या दृष्टीने बचतीचे चांगले सामाजिक, आर्थिक, राजकिय परिणाम आता दिसू लागले आहे. महीलांमध्ये परावलंबित्वाची भावना कमी होऊन त्या दिशेने वैचारिक वर्तन करू शकतो. या आत्मविश्वासाने त्या कार्य करू लागल्यामूळे शासनाने पुढाकार घेऊन महीला विकासाच्या योजना सुरू केल्या आहेत. महीलांची चळवळ जागतिकदृष्टीने महत्वाची ठरली आहे. जागतिक बॅकेला, संयुक्त राष्ट्रसंघाला आणि अमेरिकासारख्या धनाढय राष्ट्रालाही महीला चळवळीचे महत्व पटले आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जागतिक क्रमवारीत दुसरा असलेला भारत या देषात अनेक वर्षापर्यंत भारतीय राजकारणापासून स्त्रीया अलिप्त होत्या. राजकिय सहभागाविषयी पाहिजे तेवढे विचारमंथन, चर्चा, संवाद तेवढया प्रमाणात झाले नाही. ग्रामीण भागात स्त्रियांचा राजकिय सहभाग पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात सक्रियता वाढली आहे. परंतु संसदेत व राज्याच्या विधिमंडळात महीलांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत फार कमी राहिले आहे. 1952 पासून 2019 पर्यंत लोकसभेतील महीलांची टक्केवारी 4.4 ते 10 टक्के एवढयावरच मर्यादीत राहिली आहे. स्त्रीयांनी भारताच्या विकासात आपापल्या पटीने योगदान देवून सामाजिक, आर्थिक, राजकिय इत्यादी क्षेत्रात आपली छाप सोडलेली आहे. या अभ्यासावरून लक्षात येते की, स्त्रियांचे प्रमाण अधिक असणे लोकशाहीच्या दृष्टीने व महीलांना अधिक सक्षमक रण्याच्या दृष्टीने कायदेमंडळात आरक्षण मिळणे किती आवयक आहे हे लक्षात येते.

आधुनिक पंचायती राज्याचे यषापयष आणि सुधारणा :

देशातील सर्वच राज्यांनी ग्रापंचायती, पंचायती राज्य प्रस्थापित केले. 31 मार्च 1971 पर्यंत देषात 2.15 लक्ष ग्रामपंचायती होत्या आणि त्यामूळे 98 टक्के भारतीय ग्रामस्थ सहभागी होते. आधुनिक पंचायती राज्य ग्रामविकासाचा महामार्ग बनावा; स्वावलंबी, समृद्ध, कार्यक्षम, समताधिष्ठित, लोकशाहीयुक्त निरोगी खेडी उदयाला येवूनही खेडी सहकारी समाजवादी संघराज्य बनावित अशा आकांक्षा बाळगल्या गेल्या. जवळपास चाळीस-बेचाळीस वर्षाच्या पंचायती राज्याच्या अनुभवानंतर हे लक्षात आले की, पंचायती राज्याने ग्रामीण भागाचा कायापलट केला. खेडयाच्या आर्थिक, सामाजिक, राजकिय विभागावर दूरगामी परिणाम घडविले. पण तरीही आधुनिक पंचायती राज्यात विसंगी राहिल्या आहेत.

पंचायत राज्याचे यश :

1) **लोकषाही बळकट होण्यास मदत :** लोकशाही खेडयांमध्ये, तळागळातल्या लोकांमध्ये रूजायला सुरूवात झाली. सत्तेचे विकेंद्रिकरण झाले. बहुजनांच्या, साक्षर, निरक्षर खेडूतांच्या हाती सत्ता येऊ लागली.
2) **ग्रामीण पूनर्रचनेचे साधन :** सामाजिक, आर्थिक, राजकिय अशा अनेक पातळयांवर खेडयांचे हे पारंपारीक चित्र बदलून पूनर्रचनेचा, म्हणजेच रचनात्मक परिवर्तनाला पचायती राज्याने गती दिली.

पंचायती राज्य आणि सामाजिक परिवर्तन :

खेडी परंपरेने जात्यंध, परंपरानिष्ठ, निरक्षर, अंधश्रद्धा म्हणूनच ओळखली जायची. शिक्षण, मानवी, गुणवत्ता, कर्तत्व यांना महत्व न देता जन्म, जात, कुटुंब अषा प्रार्थमिक निष्ठा (Premordial Loyalities) याच महत्वाच्या मानल्या जात असत. समजात निष्चित असे कायदे नव्हते. जातीपंचायती आणि त्यांनी रूढ केलेले नियम हेच वर्तनाचे आधार होते. जन्माधिष्ठित उच्च कनिष्ठात, अस्पृष्यता सर्वमान्य होती. ग्रामीण भारतातील ही समाजस्थिती आजही अमूलाग्रपणे बदलेली नाही पण तुलनेने या समाजस्थितीत पंचायतराजमुळे बदल झालेला दिसतो.

सर्व जातींकडे गाची सत्ता ग्रामपंचायतीमूळे जाऊ शकली. आधुनिक मूल्य, कायदे, पंचायतीद्वारे ग्रामस्थांपर्यंत पोहचू लागले. पंचायतीच्या व्यासपीठावर गावकरी गावच्या सामाजिक समस्यांवर चर्चा करू लसगले. तोडगा काढयाचा प्रयत्न करू लागले. गावातील गुन्हेगारी, भांडणतंटे यांचे नियोजन करू लागले.

पंचायती राज्य आणि राजकिय पूनर्रचना :

ग्रामीण भारतात सत्ता ही काही ठराविक उच्च जातीकडे केंद्रित झालेली होती. मोठे जमीन मालक, जमीनदार, पाटील हेच खेडयाचे सत्ताधीष होते. ब्रिटिश काळातील जमीनदारी खेडयात तर लोकांच्या राजकिय जाणीवा पूर्ण बोथळ झालेल्या होत्या.

आधुनिक पंचायतींची रचना, कार्यपद्धती, कार्यकक्षा, सामाजिक उत्तरदायित्व, नेत्यांची निवड या सर्वच बाबतीत वेगळी, लोकषाहीवादी, सर्वसमावेषक अशी आहे. प्रौढ मतदान पद्धतीचा स्वीकार केल्या गेल्यामूळे गावच्या प्रत्येकाला ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेपर्यंतच्या सर्व निवडणूकित सहभाग घेणे, मतदान करणे शक्य झाले.

1) ग्रामीण भागातील दुर्बल घटाकंच्या सबलीकरणाला पोषक :

पंचायती राज ग्रामीण सबलीकरणाला पोषक ठरू शकते, दलित, आदिवासी, स्त्रिया यांना पुढे आणण्यासाठी, निर्णय प्रक्रियेत त्यांना सहभागी करण्यासाठी पंचायती राज्य हे साधन ठरू शकते. असे काही ग्रामपंचायतींनी दाखवून दिले आहे.

1996 च्या 73 व्या घटनादुरूस्तीनंतर स्त्रियांना पंचायती राज्यात व्यापक अधिकार दिले गेले पण त्याही आधीपासून सर्व स्त्री सदस्य असणाऱ्या ग्रामपंचायती अस्तित्वात होत्या. 1994-95 मध्ये महाराष्ट्रातील अशा 20

गावांपैकी 12 गावांच्या सर्व स्त्री सदस्य ग्रामपंचायतींचा अभ्यास आलोचना या संस्थेने केला होता. ती बारा गावे अशी होती (1) ब्राम्हणघर, (2) भेंडेखुर्द, (3) मेटिखेडा, (4) बिटनेर, (5) येनोरा, (6) सालोड, (7) एरगाव, (8) बिरगाव, (9) निमगाव भोगी, (10) राळेगण सिद्धी, (11) मौजे रूई, (12) निंबुत.

सगळीकडेच राजकारण ही पुरूषांची मक्तेदारी असताना स्त्रियांच्या पुढाकाराने, प्रयत्नाने या ग्रामपंचायती स्त्रियांनी ताब्यात घेतल्या. पाण्याची समस्या, स्त्री निरक्षरांचे मोठे प्रमाण, दारूबंदी, स्त्रियांची असुरक्षितता व खास प्रष्न यांना या ग्रामपंचायतींनी महत्व दिले. स्त्रियांचे नेतृत्व, स्त्रियांचे राजकारण हे पंचायती राज्यामुळे पुढे येऊ शकेल.

2) निवडणूक प्रक्रियेची ओळख :

भारतातील बहुसंख्य लोक खेडयात राहतात. त्यांना निवडणूक प्रक्रियेची ओळख पंचायती राज्यामुळे झाली. स्थानिक स्वराज्य निवडणूकांतून मिळालेले हे लोकशाहीचे धडे राज्य व राष्टीय पातळीवरील निवडणूक प्रक्रियेत ग्रामस्थांना सामील होण्यास उपयुक्त ठरले. उमेदवार अर्ज भरणे, निवडणूक प्रचार करणे, मतदान करणे यांबाबत ग्रामस्थ जागरूक बनले.

3) पंचायती राज्य :

शासकिय विकास, कार्यक्रमांना सहायक ठरावेत अशी उपेक्षा होती. काही ठिकाणी ही अपेक्षा पूर्ण झालेली दिसते. ग्रामीण भागातील सहकारी आंदोलने, विविध विकास योजना, शेती सुधारणा कुटिरोद्योग योजना अशा अनेक प्रयत्नाद्वारे लोकांना उपजीविकेची साधने उपलब्ध करून देण्याची क्षमता वाढली.

4) खेडयाचा पायाभूत विकास होऊ शकला :

ग्रामपंचायतींना करून देण्यात आलेली आर्थिक तरतूद तुटपुंजी असूनही शाळा, रस्ते बांधणे, विहिरी, कूपनलिका खोदणे, वीज, पाणी इत्यादी मूलभूत सुविधा गावात होऊ शकल्या.

5) पंचायती राज्यामूळे राज्याच्या अगदी कोणाकोपऱ्यात असलेल्या गावांचा केंद्रिय/राज्यसत्तेषी संवाद प्रस्थापित होऊ शकला. उच्चपदावरील अधिकारी, मंत्री यांच्या नजरेत ग्रामीण समस्या आणण्याचा कामी पंचायतींची भूमिका महत्वपूर्ण बनली.

आधुनिक ग्रामीण राजकिय नेतृत्वाचे परिणाम यश आणि मर्यादा :

पंचायती राज्यातून निर्माण झालेले नवे स्थानिक नेतृत्व हे ग्रामीण आर्थिक, सामाजिक, राजकिय पुनर्रचनेचे व विकेंद्रीत लोकशाहीचे संदर्भात पंचायती राज्याचे यश पुढील मुद्यांद्वारे मांडता येईल.

1) सर्वसामान्यांना संधी मिळाली : जात, धर्म, घराणे, जमीन मालकी हे घटक पंरपरेने नेतृत्व निश्चीती करत होते. पंचायती राज्यामुळे सर्वसामान्यांना, बहुजनांना आपल्या मतांच्या किंवा संख्येच्या ताकदीवर नेतृत्वाची संधी मिळाली.

रेटझूलप (Retzlaff) यांच्या निरिक्षणानुसार पंचायती राज्याच्या निवडणुकांमुळे ग्रामीण उत्तर प्रदेशातील विविध जीतींची राजकिय समीकरणे बदलली. तसेच बहुजन जातींना नेतृत्वाची संधी मिळाली. 73 व 74 व्या घटनादुरूस्तीमुळे अनुसूचित जाती जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आणि स्त्रियांना 33 टक्के जागा राखीव ठेवल्याने त्यांनाही नेतृत्वावर थोडाफार प्रभाव टाकता आला.

2) नव्या नेतृत्वानुसार विकासकार्याचे अग्रक्रम बदलले : काही पंचायतींचे नेतृत्व स्त्रिया व दलितांकडे, सामान्यांकडे गेले. त्यांना गावच्या विकास कार्यक्रमांमध्ये आपल्या प्रश्नांना अग्रक्रम दिले. महाराष्ट्रातील सर्व स्त्री सदस्य ग्रामपंचायतींच्या अभ्यासावरून हे स्पष्ट होते की, तेथील स्त्री, नेतृत्वाने पाणी, स्त्री साक्षरता, स्त्री आरोग्य, आहार, संडार निर्धूर चूल, दारूबंदी, शाळा, हुंडा, बालविवाह, पर्यावरण, बचत गट, अंधश्रद्धा इत्यादी मुद्यांना अग्रक्रम दिले.

3) विशिष्ट जातींची सत्तेतील मक्तेदारी संपली : खेडयातील सत्ताधारी जातींना पंचायती राज्याने हादरा दिला. सामान्यांना मतदानाचा अधिकार मिळाल्याने विविध जातींच्या नवनव्या संयोगास चालना मिळाली, असे इव्हलीन वूउ यांना आढळून आले.

4) मतदारांच्या गरजा, अपेक्षांप्रमाणे कारभार : सर्वसामान्य गावकऱ्याना नेता निवडीबाबत अधिकार मिळाल्याने त्यांच्या गरजा, अपेक्षा, भावभावना ग्रामीण नेतृत्वाला लक्षात घ्याव्या लागत आहेत. गावाचा विकास गावाच्या दृष्टिकोनातून, गावाच्या गरजानूसार, गावाच्या निर्णयाने होण्यास मदत झाली. **डॉ.**एम.एन. श्रीनीवास त्यांच्या "Social Change in Modern India" पुस्तकात म्हणतात. "पंचायती राज्यामूळे ग्रामीण भागाल स्वावलंबी बनविण्यात आणि दलित मागास जातींना सत्तेत सहभागी होण्यास हातभार लागला."

5) राजकिय डावपेच षिकविले : आधुनिक पंचायतींनी ग्रामीण लोकांना लोकशाहीचे धडे दिले. नव्या ग्रामीण नेतृत्वाला लोकांना संघटित करणे, राजकिय गटांची मोडतोड, पुर्नबांधणी करणे, कूटनीती, निर्णय घेणे, मतदारांना प्रभावित करणे इत्यादी राजकिय समीकरणेही शिकविली. नेत्यांच्या सावलीत वावरणाऱ्या अनुयायांचेही राजकिय सामाजिकरण झाले. नेतृत्वाची नवी पिढी पडत गेली.

6) ग्रामीण विकासाला काहीशी गती मिळाली : नव्या ग्रामीण नेतृत्वाने ग्रामीण विकासाला काहीशी गती व दिषा दिली तरी खेडयांचा खूप मोठा कायापालट झाला असे म्हणता येणार नाही. पंचायती राज्य व्यवस्थेतील त्रुटी, जातील राजकारण, खेडुतांची निरक्षरता, प्रतिगामी वृत्ती याचंबरोबर ग्रामीण परिवर्तनाला कारणीभूत आहेत.

संदर्भग्रंथ :

- लोटे, रा.ज., 'भारतीय शासन आणि राजकारण', पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जून 2009.
- पळशीकर, सुहास, 'महाराष्ट्राचे राजकारण', प्रतिमा प्रकाशन, पुणे, मार्च 2009.
- लोकराज्य, मार्च 2017, 'माहिती व जनसंपर्क महासंचालनालय', मंत्रालय, मुंबई.
- योजना मासीक, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.
- भारतीय खेडी अर्थ व राजकारण, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.